अपिल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका
जावक.क्र. 1951
दिनांक. 30/11/17

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

**अपिलार्थी**
श्री. ओव्हाळ दिनेश नेमाजी
रा. स.नं २७, पंचशिल नगर,
येरवडा, पुणे ६

**विरूध्द**

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका

## विवेचन

अर्जदार श्री. ओव्हाळ दिनेश नेमाजी रा. स.नं २७, पंचशील नगर, येरवडा,पुणे ६ यांनी आवक क्र. २२९ दि. १.११.२०१७ रोजी अपिल केलेले आहे. त्या अपिलाची सुनावणी दि. २८.११.२०१७ रोजी स.११.०० वा. ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री ओव्हाळ दिनेश नेमाजी तसेच जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. सुरेश साखळे , सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री. विवेक डुब्बेवार हे उपस्थित होते. अपिलार्थी यांचा सर्वप्रथम अर्ज दि. १३.१०.२०१५ रोजी अतिक्रमण काढावे व जागा पहाणी करावी असा अर्ज प्रकरणी समाविष्ट आहे. दि. ५.४.२०१७ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केले. प्रथम अपिल सुनावणी निर्णयामध्ये उल्लेख आहे. दि. ३०.५.२०१७ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी अपिलार्थी , कनिष्ठ अभियंता, प्र. कार्यकारी अभियंता उपस्थित होते. त्यानंतर पत्र क्र माअ/पापु/४० दि.३.६.२०१७ ने अपिलार्थी यांना सुनावणी आदेश दिलेले आहे. प्रथम अपिल अधिकारी यांनी दि. ३०.५.२०१७ रोजी सुनावणी घेवून आदेश पारित केला आहे.

दि. १.११.२०१७ अपिलार्थी यांची पुन्हा प्रथम अपिल अधिकारी यांचे अर्ज केला आहे. वास्तविक पाहता प्रथम अपिल अधिकारी यांची यापूर्वी सुनावणी घेवून आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

# सुनावणी आदेश

अर्जदार श्री दिनेश नेमाजी ओव्हाळ यांनी दि.५.४.२०१७ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकारांतर्गत अपिल अर्ज केला होता. तसेच यापूर्वी अपिलार्थी यांची सुनावणी दि. ३०.५.२०१७ रोजी प्रथम अपिल लष्कर पाणी पुरवठा येथे अपिल प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी घेतलेली आहे. त्यानुसार आदेश पारित केलेले आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी जा.क्र. माअ/३ दि. १३.१०.२०१७ व जा.क्र. माअ/६ दि. १.११.२०१७ अन्वये माहिती दिली आहे. प्रथम अपिलामध्ये निर्णय झालेला असल्याने पुन्हा अपिल चालवता येणार नाही.

वरील बाबीचा विचार करता अपिल निकाली काढण्यात येत आहे.

गणपत साळुंके
(मो.नं. ९६८९९३१७४२ ,)
कार्यकारी अभियंता तथा अपिल अधिकारी
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

**टीप** :- वरील आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास द्वितीय अपिल मा. कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधानभवन समोर, पुणे १ येथे अपिलाच्या निकालापासून ९० दिवसांच्या आत अपिल करू शकतील.

प्रत :-१. श्री. सुरेश साखळे
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

२. श्री. विवेक डुब्बेवार
सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

३. श्रीमती अरूणा चौरे
सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका